वाचा :१) मंजूर पीआयपी सन २०२३-२४ नुसार.
२) मा.आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, रा.आ.अ.मुंबई यांचे पत्र जा.क्र.आसेआ/कक्ष ३/टि-२४/e-HMIS /१३३७६-१३४९६/२३, दि.२३/११/२०२३.
३) दि.२४/०१/२०२४ रोजीची प्रसिध्द जाहिरातीनुसार.
४) गुणवत्तेनुसार अंतिम निवड व प्रतिक्षा यादी
५) या कार्यालयाची मंजुर टिपणी.

जा.क्र./जिरुजा/NHM-ESTB/FM-e-HMIS/नियुक्तीआ/ 6422-28/२४
कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, जालना.
दिनांक : ~~१४~~ 15/०३/२०२४.

**नियुक्ती आदेश**

वरील संदर्भाअन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या **e-HMIS** कार्यक्रमांतर्गत आपल्या नावा समोर दर्शविल्या ठिकाणी **Facility Manager-e-HMIS (Implementation Engineer)** या पदा करीता आपली नियुक्ती ही नियुक्ती **दिनांकांपासून ते दिनांक २९/०६/२०२४ या** कालावधीकरीता निव्वळ कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी-शर्तीच्या आधीन राहून नियुक्ती आदेश देण्यात-येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | कार्यक्रमाचे नाव | निवड संवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण | एकत्रित मानधन रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | **श्रीमती उज्वला ग्यानोजी म्हस्के, मो.नं.८७८८४९९१८१** | **e-HMIS** | SC | **e-HMIS** कक्ष जिल्हा रुग्णालय, जालना | २५,०००/- |
| २ | **श्री. शेख इम्रान बद्रोद्दीन मो.नं.७९७२६८०६१७** | | Open | **e-HMIS** रा.आ.अ. जिल्हा परिषद, जालना | २५,०००/- |

- **अटी व शर्तीः**

१) आपली सदरची नियुक्ती ही वरील तक्त्यात नमुदनुसार **Facility Manager-e-HMIS (Implementation Engineer)** या पदी नियुक्ती करण्यात येत असून सदर पदावर आपण नियुक्ती दिनांकांपासून ७ दिवसाच्या आत रुजू होणे बंधनकारक आहे, तसेच आपण ७ दिवसाच्या आत रुजू न झाल्यास सदर पदावर आपला कोणताही हक्क राहणार नाही.

२) **आपली नियुक्ती ही आपल्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी नियुक्ती आदेश दिनांकापासून ते दिनांक २९/०६/२०२४ रोजीपर्यंत** राहील. सदर पदे राष्ट्रीय आरोग्य अभियान योजना बंद पडेपर्यंत किंवा पीआयपीमध्ये सदर पदे मंजूर न झाल्यास आपली नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल, यासाठी आपणास कोणत्याही स्वरुपाची वेगळी सुचना दिली जाणार नाही.

३) सदर पद भरती ही राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर असून आपण सादर केलेली कागदपत्रांच्या तपासणी अंती करण्यात आली आहे. यास कोणी आव्हान केल्यास आपली सर्वस्वी जबाबदारी असेल. तसेच त्यानुषंगाने आपली सेवा तात्काळ संपुष्टात येऊन आपणावर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

४) नियुक्ती कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियूक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

५) नियमित स्वरुपात नियुक्ती केलेल्या जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या / राज्य सरकारच्या सेवा सुविधा आपणास अनुज्ञेय राहणार नाही.

६) आपली नियुक्ती ही **Facility Manager-e-HMIS (Implementation Engineer)** या पदावर करार पध्दतीने केलेली सेवा वेतन निश्चिती, सेवा निवृत्ती वेतन, सेवा सलगता किंवा अन्य कोणत्याही बाबींसाठी ग्राहय धरता येणार नाही.

७) आपणास कंत्राटी पध्दतीने **Facility Manager-e-HMIS (Implementation Engineer)** पदावर म्हणून हमिपत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास आपणास एक महिन्या पुर्वी लेखी सूचना जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, जालना यांना देणे अथवा एक महिना मानधनाची रक्कम जमा करणे आवश्यक राहिल.

८) आपण विहित मुदतीत तशी पूर्वसुचना न दिल्यास किवा मानधनाची रक्कम जमा न केल्यास आपणास पून्हा भविष्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नियूक्ती देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

९) करार पध्दतीने **Facility Manager-e-HMIS (Implementation Engineer)** या पदांकरिता आपणास **रु.२५,०००/- इतके एकत्रित मानधन देण्यात येईल**. त्याखेरीज इतर कोणतेही वित्तीय लाभ आपणास अनुज्ञेय राहणार नाही.

१०) जिल्हा सोसाटीमध्ये कंत्राटीपध्दतीने काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना वर्षातुन फक्त ८ किरकोळ रजा व ७ वैद्यकिय रजा उपभोगता येतील. या व्यतीरिक्त कोणतीही रजा देयक राहणार नाही तसेच स्त्री कर्मचाऱ्यांना दोन बाळांतपणापर्यंत (२ मुले जिवंत) १८० दिवस पुर्ण पगारी रजा अनुज्ञय राहिल परंतु संबंधित स्त्री कर्मचाऱ्यास रजा उपभोगून कामावर रुजू झाल्यानंतर पुढील सलग १ वर्षा सेवा पूर्ण करणे बंधन कारक राहील. (१) वर्षाच्या कमी कालावधीत राजीनामा दिल्यास प्रसूती रजा कालावधी मधील मानधन वसूल करण्यात येईल.

११) **Facility Manager-e-HMIS (Implementation Engineer)** या पदावर नेमणूक झालेल्या उमेदवाराने सात दिवसाच्या आत रुजू होवून रुपये रु.१००/- च्या बॉण्ड पेपरवर विहीत नमुन्यात वरील अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा लिहून देणे बंधनकारक आहे, त्याशिवाय मानधन अदा करण्यात येणार नाही.

१२) आपण हजर झाल्यानंतर एक महिन्याच्या आत मा.जिल्हा शल्य चिकित्सक, जालना यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१३) सदर पद हे कंत्राटी स्वरुपात असल्याने आपणास कोणत्याही प्रकारचा मा.न्यायालय/मा.उच्च न्यायालय दावा दाखल करता येणार नाही.

१४) नियुक्ती कालावधीमध्ये गैरवर्तणुक, वारंवार गैरहजर राहणारे, रुग्णसेवा संदर्भात तक्रारी असलेले व बेशिस्त कर्मचारी यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१५) आपणास दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी (मुख्यालयास) वास्तव्यास राहणे बंधनकारक राहिल.

**अध्यक्ष**
**निवड समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, जालना**

Chief Executive Officer
Zilla Parishad Jalna

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर.**

मा.आयुक्त (कु.क.) आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक, मुंबई.

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, जालना.
२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.
३) अति.जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, जालना यांना देवुन सुचित करण्यात येते की, उक्त कर्मचा-यांना रुजु करुन घ्यावेत व त्याबाबतचा एकत्रित अहवाल या कार्यालयास सादर करावा.
४) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, रा.आ.अ.,जि.प.जालना.
५) जिल्हा लेखा व्यवस्थापक, रा.आ.अ.जि.प.जालना.
६) फायनान्स कम लॉजीस्टीक कल्सटंट (FLC), जि.रु.जालना यानां देवुन सुचित करण्यात येते की, उक्त कर्मचा-यांचे रुजु अहवाल, आधार कॉपी, पॅन कॉपी व बँक खात्याचा तपशील इत्यादी माहिती त्वरीत जमा करुन रुजु झालेल्या कर्मचा-यांची PFMS प्रणालीमध्ये माहिती अदयावत करुन या कार्यालयास विहित मुदतीत माहिती सादर करावेत.
७) संबंधीत कार्यक्रम समन्वयक/प्रमुख, जि.रु.जालना.
८) संबंधितास.

स्वा -

**अध्यक्ष**
**निवड समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, जालना**